Subject: Political Science

LYCEUM INDIA Journal of Social Sciences

Title: **महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 च्या निकालाचे विश्लेषणात्मक अध्ययन**

Author(s): **डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर**
**उत्तमचंद बगडीया कला व वाणिज्य महाविद्यालय रिसोड जि,वाशिम (म.रा.)**

Abstract: भारताच्या राज्यघटनेत संसदीय शासन प्रणालीचा अंगीकार करण्यात आला आहे. संसदीय शासन पद्धती ही जबाबदार शासनपद्धती मानली जाते. भारतीय राज्यघटनेने स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही ही शासनपद्धतीची ओळख प्रतिनिधिक लोकशाही अशीही आहे. कार्यकारी मंडळ केंद्रस्तरावर लोकसभेला आणि घटक राज्य स्तरावर विधानसभेला जबाबदार असते. कार्यकारी मंडळाचे संसद आणि विधिमंडळा प्रति उत्तरदायित्व हा भारतीय संसदीय कार्यपद्धतीचा गाभा आहे. प्रौढ मतदारांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत कायदेमंडळ म्हणजे लोकसभा आणि विधानसभा अस्तित्वात येतात. या कायदेमंडळातूनच कार्यकारी मंडळाची निर्मिती होते. प्रत्येक पाच वर्षांनी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी स्वतंत्र व स्वायत्त अशा भारतीय निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे. भारतीय घटनेच्या कलम 324 अन्वये घटनात्मक अधिष्ठान प्राप्त झालेल्या भारतीय निवडणूक आयोगातर्फे स्वतंत्र, निष्पक्ष, भयमुक्त व खुल्या वातावरणात निवडणुका होऊन निवडून येणारे लोकप्रतिनिधी राज्यासंबंधी कायदा तयार करणे, धोरण निर्माण करणे, राज्याच्या विकासाच्या दृष्टीने विधायक कामे पार पाडणे अशा जबाबदार्या पार पडतात. हे प्रतिनिधी विशिष्ट प्रक्रियेतून निवडून जातात. त्यांना निवडून देण्याची लोकशाही मार्ग म्हणजे सार्वत्रिक निवडणुका होत. भारतीय संसदीय लोकशाहीच्या जडणघडणीमध्ये घटक राज्य स्तरावरील विधानसभा निवडणुकांना सुद्धा विशेष महत्त्व असते.

Keywords: महाराष्ट्र, विधानसभा, संसदीय शासन

**प्रस्तावना-**

भारताच्या राज्यघटनेत संसदीय शासन प्रणालीचा अंगीकार करण्यात आला आहे. संसदीय शासन पद्धती ही जबाबदार शासनपद्धती मानली जाते. भारतीय राज्यघटनेने स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही ही शासनपद्धतीची ओळख प्रतिनिधिक लोकशाही अशीही आहे. कार्यकारी मंडळ केंद्रस्तरावर लोकसभेला आणि घटक राज्य स्तरावर विधानसभेला जबाबदार असते. कार्यकारी मंडळाचे संसद आणि विधिमंडळा प्रति उत्तरदायित्व हा भारतीय संसदीय कार्यपद्धतीचा गाभा आहे. प्रौढ मतदारांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत कायदेमंडळ म्हणजे लोकसभा आणि विधानसभा अस्तित्वात येतात. या कायदेमंडळातूनच कार्यकारी मंडळाची निर्मिती होते. प्रत्येक पाच वर्षांनी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी स्वतंत्र व स्वायत्त अशा भारतीय निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे. भारतीय घटनेच्या कलम 324 अन्वये घटनात्मक अधिष्ठान प्राप्त झालेल्या भारतीय निवडणूक आयोगातर्फे स्वतंत्र, निष्पक्ष, भयमुक्त व खुल्या वातावरणात निवडणुका होऊन निवडून येणारे लोकप्रतिनिधी राज्यासंबंधी कायदा तयार करणे, धोरण निर्माण करणे, राज्याच्या विकासाच्या दृष्टीने विधायक कामे पार पाडणे अशा जबाबदार्या पार पडतात. हे प्रतिनिधी विशिष्ट प्रक्रियेतून निवडून जातात. त्यांना निवडून देण्याची लोकशाही मार्ग म्हणजे सार्वत्रिक निवडणुका होत. भारतीय संसदीय लोकशाहीच्या जडणघडणीमध्ये घटक राज्य स्तरावरील विधानसभा निवडणुकांना सुद्धा विशेष महत्त्व असते.

राज्यस्तरावरील निवडणुकीच्या राजकारणाचे संदर्भ केवळ विशिष्ट राज्या पुरतेच मर्यादित नसतात. तर ते संपूर्ण देशाच्या राजकारणावरही परिणाम करणारे ठरतात. तात्पर्य विधानसभा निवडणुका या राज्याच्या स्थानिक राजकारणावर परिणाम करतात, म्हणून राज्याच्या विधानसभा निवडणुकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. त्यातून राज्याचे आणि राष्ट्राच्या राजकारणाचे विश्लेषण आणि आकलन होते. त्यातून दोन्ही पातळयावरील राजकारणाची प्रक्रिया, ज्याला राज्यशास्त्राच्या परिभाषेत राजकीय प्रक्रिया म्हणून ओळखले जाते. विधानसभा निवडणुकीच्या राजकीयदृष्ट्या अभ्यासाचे आणखी एक महत्त्व म्हणजे घटक राज्य पातळीवरील राजकीय सहभागाचा आणि मतदान वर्तनाचा अभ्यास करणे शक्य होते. म्हणून प्रस्तुत संशोधनपर लेखाची मांडणी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 च्या निकालाचे विश्लेषणात्मक अध्ययन या शीर्षकाखाली केलेली आहे.

**संशोधन विषय निवडीचे प्रयोजन-**

संपूर्ण भारतात महाराष्ट्र हे एक आघाडीचे राज्य आहे. आर्थिक राजधानी म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या प्रभाव संपूर्ण भारतावर दिसून येतो. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूक निकालाचे पडसाद संपूर्ण भारतभर दिसून येतात. महाराष्ट्रातील राजकारण हे देशाच्या राजकारणाला प्रभावित करणारे राजकारण आहे. सन 2014 व 1919 साली महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने प्रभावी कामगिरी केली होती. 2024 च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भारतीय जनता पक्ष प्रभावी पक्ष म्हणून उदयास आला आहे. महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाचे नेतृत्वात शासन स्थापन झाले आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचे

विविध घटकांच्या आधारे विश्लेषण करून अध्ययन करणे अगत्याचे आहे. याबाबत संशोधन करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत संशोधन विषयाची ची मांडणी केलेली आहे

**संशोधनाची उद्दिष्टे-**

प्रस्तुत संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी पुढील उद्दिष्टे मांडण्यात आली आहेत.

1) सन 2024 मधील मधील महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा अभ्यास करणे.

2) सन 2024 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील पक्षीय वर्चस्वाचा अभ्यास करणे.

3) महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय समीकरणांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके-**

गृहिकांचा आधार घेऊन संशोधन नियोजित उद्देशांची पूर्तता करू शकतो. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहीतके निर्धारित केली आहेत.

1) सन 2024 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये सरकार विरोधी लाटेचा प्रभाव दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीमध्ये विधानसभा मतदार संघातील राजकीय समीकरणे बदललेली नाहीत .

**संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा -**

महाराष्ट्रातील सन 2024 च्या विधानसभा निवडणुकीची राजकीय अभ्यासाच्या दृष्टीने व्याप्ती अधिक आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 या निवडणुकीचा संक्षिप्त स्वरूपात अभ्यास करून विविध घटकाच्या आधारे विधानसभा मतदार संघामधील विधानसभा निवडणुक निकालाचे विशेष अध्ययन केले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी निश्चित उद्दिष्ट आणि गृहितके यांच्याशी निगडित संशोधन व विश्लेषण यावर विशेष भर दिला जाणार आहे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त ठरणारी माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला आहे. दुय्यम साधनांमध्ये नियतकालिके उपलब्ध साहित्य व शासनाचे विविध अहवाल यांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन लेखाचे विश्लेषण:-**

भारतीय निर्वाचन आयोगाने दिनांक 15 आक्टोंबर 2024 ला ECI/PN/149/2024 या आदेशानुसार महाराष्ट्र विधानसभेकरिता निवडणूक घेण्याची अधिसूचना जाहीर केली. त्यानुसार दिनांक 20 नोव्हेंबर 2024 ला मतदान घेण्याचे निर्देशित करण्यात आले. महाराष्ट्रात नोंदणीकृत असलेल्या 96485765 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. महाराष्ट्रात विधानसभे करिता एकूण 288 विधानसभेच्या जागा आहेत. त्यापैकी 29 जागा ह्या अनुसूचित जाती करिता तर 25 जागा अनुसूचित जमाती करिता राखीव आहेत. महाराष्ट्रात महिला मतदारांची संख्या 4,69,96,279 व पुरुष मतदारांची संख्या 5,00,22,739 आहे. महाराष्ट्रात एकूण मतदार 9,70,25,119 आहेत. या मतदारांनी मतदानाचा अधिकार वापरले आहे. भारतीय जनता पक्षातील 98% विजयी उमेदवार करोडपती आहेत. 8% विजयी उमेदवार हे 25 ते 40 या वयोगटातील आहेत. 65% विजयी उमेदवार हे 41 ते 60 या वयोगटातील आहेत.विजयी झालेल्या उमेदवारापैकी 8% महिला उमेदवार आहेत. 2019 मध्ये विधानसभेत महिलांची हीच संख्या होती.

सारणी क्रमांक -1
पक्षनिहाय विजयी उमेदवारांची संख्या व प्राप्त मत प्रतिशत

| अ.क्र. | पक्षाचे नाव | विजयी उमेदवारांची संख्या | मिळालेली एकूण मते | प्राप्त मत प्रतिशत |
|---|---|---|---|---|
| 1. | भारतीय जनता पक्ष | 132 | 17,293,650 | 26.77 |
| 2. | शिवसेना | 57 | 7,996,930 | 12.38 |
| 3. | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | 41 | 5,816,566 | 9.01 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4. | शिवसेना (उबाढा) | 20 | 6,433,013 | 9.96 |
| 5. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | 16 | 8,020,921 | 12.42 |
| 6. | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) | 10 | 7,287,797 | 11.28 |
| 7. | समाजवादी पार्टी | 2 | 247350 | 0.38 |
| 8. | जनसुराज्य पार्टी | 2 | 559702 | 0.87 |
| 9. | राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टी | 1 | 440675 | 0.58 |
| 10 | राष्ट्रीय समाज पक्ष | 1 | 438992 | 0.48 |
| 11 | All India Majlis-E-Ittehadul Muslimeen 1 | 1 | 550902 | 0.85 |
| 12 | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | 1 | 222277 | 0.34 |
| 13 | Peasants And Workers Party of India | 1 | 540796 | 0.76 |
| 14 | राजश्री शाहू विकास आघाडी | 1 | 560901 | 0.89 |
| 15 | अपक्ष | 2 | 8021021 | 13.82 |
| | एकूण | 288 | 96485765 | 100 |

सारणी क्रमांक -1 चे अध्ययन करता असे दिसून येते की, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 च्या निकालात भारतीय जनता पक्षाचे सर्वाधिक उमेदवार विजयी झाले. भारतीय जनता पक्षाचे 132 उमेदवार विजय होऊन महाराष्ट्र विधानसभेत प्रथम क्रमांकाचा पक्ष म्हणून उदयास आला. शिवसेनेचे 57 उमेदवार विजय होऊन दुसऱ्या क्रमांकाचे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे 41 उमेदवार विजय होऊन तिसऱ्या क्रमांकाचे पक्ष म्हणून उदयास आले आहे. भारतीय जनता पक्ष, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी विधानसभेत बहुमत प्राप्त करून सत्ता स्थापन केली आहे. शिवसेना (उबाठा ),भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) या गटाला विधानसभेत अपेक्षित प्रदर्शन करता आले नाही. भारतीय जनता पक्षाने बहुमत प्राप्त करून प्रथम क्रमांकाचा पक्ष म्हणून विधानसभेत आला असला तरीही या पक्षाला प्राप्त मताचे टक्केवारी 26.77% आहे. भारतीय जनता पक्षाला प्राप्त मतांची टक्केवारी पाहता विशेष प्रदर्शन प्राप्त मतानुसार केल्याचे दिसून येत नाही. तरीही हा पक्ष सर्वाधिक सदस्य असलेला पक्ष म्हणून विधानसभेत सत्तारूढ झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला 41 जागा मिळाल्या असल्या तरीही या पक्षाला प्राप्त मताची टक्केवारी 9.01% आहे. शिवसेना (उबाठा)या गटाचे 20 उमेदवार निवडून आले असले तरीही या पक्षाला प्राप्त मतांची टक्केवारी ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला प्राप्त मताच्या टक्केवारी एवढीच आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला प्राप्त मतांची टक्केवारी ही शिवसेना या पक्षाला प्राप्त मताच्या टक्केवारी एवढीच असली तरीही शिवसेना पक्षाने 57 उमेदवार विजयी झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार) गटाला 11.28% मत प्रतिसाद असले तरीही या पक्षाचे दहा उमेदवार विजयी झाले आहेत. या पक्षाला प्राप्त मत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला प्राप्त मतांच्या टक्केवारी एवढीच असली तरीही काँग्रेस पक्षाचे अधिक उमेदवार निवडून आल्याचे दिसून येते.

सारणी क्रमांक -2

पक्षनिहाय अपराधिक गुन्हे असलेल्या विजयी उमेदवारांची टक्केवारी

| अ.क्र. | पक्षाचे नाव | गुन्हे असलेल्या विजयी उमेदवारांची टक्केवारी | गंभीर गुन्हे असलेल्या विजयी उमेदवारांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | समाजवादी पक्ष | 100 | 100 |
| 2. | भाजपा | 70 | 40 |
| 3. | शिवसेना | 67 | 47 |
| 4. | शिवसेना (उबाठा) | 65 | 40 |

| | | | |
|---|---|---|---|
| 5. | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) | 63 | 50 |
| 6. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | 56 | 38 |
| 7. | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | 49 | 29 |

सारणी क्रमांक - 2 नुसार महाराष्ट्र विधानसभा 2024 निकालाचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, विविध पक्षांमध्ये अपराधी गुन्हे व गंभीर स्वरूपाचे गुन्हे असलेले उमेदवार विजयी झाले आहेत. समाजवादी पक्षाचे दोन उमेदवार निवडून आले आहेत. या दोन्ही उमेदवार गंभीर स्वरूपाचे अपराधीक गुन्हे दाखल आहेत. भाजपा हा सर्वाधिक मते प्राप्त करणारा व सत्ताधारी पक्ष असला तरीही या पक्षातील 70 उमेदवारावर अपराधिक गुन्हे तर 40 उमेदवारावर गंभीर स्वरूपाचे अपराधिक गुन्हे असल्याचे दिसून येते. शिवसेना या पक्षातील विजय 67 उमेदवारावर अपराधी स्वरूपाचे गुन्हे तर 47 विजयी उमेदवारावर विशेष गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले असले तरीही हे उमेदवार विजयी झाले आहेत. वरील सारणी वरून समाजवादी पक्ष, भाजपा, शिवसेना, शिवसेना (उबाठा ),राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष( शरद पवार), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या सर्व पक्षातील उमेदवारावर अपराधीक गुन्हे व गंभीर स्वरूपाची अपराधी गुन्हे दाखल झालेली आहेत. तरीही ते उमेदवार निवडणुकीमध्ये निवडून आल्याचे दिसून येते. यावरून महाराष्ट्र विधानसभेत अपराधीक गुन्हे असलेले सदस्य अधिक प्रमाणात आहेत.

सारणी क्रमांक - 3
विजयी उमेदवारांचे शिक्षण व टक्केवारी

| अ.क्र. | शिक्षण | विजयी उमेदवारांची संख्या | विजयी उमेदवारांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | Literate | 2 | 0.69 |
| 2. | 5th Pass | 6 | 2.08 |
| 3. | 8th Pass | 20 | 6.94 |
| 4. | 10th Pass | 31 | 10.76 |
| 5. | 12th Pass | 48 | 16.67 |
| 6. | Graduate | 65 | 22.67 |
| 7. | Graduate Professional | 55 | 19.10 |
| 8. | Post Graduate | 39 | 13.54 |
| 9. | Doctorate | 8 | 2.78 |
| 10. | Diploma | 14 | 4.86 |
| | Total | 288 | 100 |

सारणी क्रमांक तीन मध्ये महाराष्ट्र विधानसभेत विजय उमेदवाराचे शिक्षण दर्शविण्यात आले आहे. या विधानसभेमध्ये अशिक्षित दोन उमेदवार आहेत. पाचवी पास सहा उमेदवार विजयी झाले आहेत. पदवीधर विजयी उमेदवारांची संख्या 65 आहे तर पदवीधत्तर पदवी शिक्षण घेतलेले 39 उमेदवार विजयी झाले आहेत. वैद्यकीय शिक्षण किंवा इंजिनियर शिक्षण घेतलेले 55 पदवीधर सदस्य या विधानसभेत विजय झाले आहेत. सारणी क्रमांक – 3 चे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, महाराष्ट्र विधानसभे मध्ये उच्चशिक्षित उमेदवार मोठ्या प्रमाणात विजयी झालेले आहेत. या विधानसभेत अशिक्षित किंवा अल्पशिक्षित सभासदाचे प्रमाण कमी आहे.

**निष्कर्ष :-**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक सन 2024 निवडणूक निकालाचे विश्लेषण करता असे स्पष्ट होते की या निवडणुकीत 2019 ते 24 या कालखंडात सत्तारूढ असलेल्या शिवसेनेला (शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्षाला सत्ता प्राप्त झाली आहे. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे सर्वाधिक 132 उमेदवार विजय होऊन महाराष्ट्र विधानसभेतील सर्वाधिक संख्याबळ असणारा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाने प्रथम स्थान मिळवले. शिवसेनेला 57 जागा मिळून दुसर्या स्थानी तर राष्ट्रवादी काँग्रेस ला 41 व शिवसेना (उबाठा) ला 20 जागा मिळून अनुक्रमे तिसरे व चोथे स्थान मिळाले आहे. 10 अन्य उमेदवारांनी विजय संपादन केला आहे. महाराष्ट्र विधानसभेत अपराधीक गुन्हे असलेले सदस्य अधिक प्रमाणात आहेत. वैद्यकीय शिक्षण किंवा इंजिनियर शिक्षण घेतलेले 55 पदवीधर सदस्य या विधानसभेत विजय झाले आहेत. महाराष्ट्र विधानसभे मध्ये उच्चशिक्षित उमेदवार मोठ्या प्रमाणात विजयी झालेले आहेत. या विधानसभेत अशिक्षित किंवा अल्पशिक्षित सभासदाचे प्रमाण कमी आहे.

सन 2024 च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत उच्चशिक्षित उमेदवारांनी विधानसभेत विजय संपादन केला आहे. या निवडणुकीत सरकारविरोधी लाटेचा परिणाम न होता भारतीय जनता पक्ष व शिवसेनेने बहुमत प्राप्त केले आहे. महाराष्ट्रातील संपूर्ण मतदारसंघात भारतीय जनता पक्ष किंवा शिवसेनेने आपला प्रभाव निर्माण केला असल्याचे दिसून आले आहे.

**संदर्भ-**

1) कर्डेकर अनिल, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर,2019, पृ.14

2) गिरमे अजय, विधानसभा परीक्षा आणि कामकाज, श्री विद्या प्रकाशन, पुणे,2019, पृ.14

3) कळसे अनंत, संसदीय लोकशाहीचे वैशिष्ट्य व विधिमंडळाचे कामकाज, मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय पुणे,2016, पृ.34

4) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना, प्रतिमा प्रकाशन पुणे, 2014, पृ.39

5) ADR, Maharashtra assembly election report, 2024.

**Citation in APA Style:**

डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर. (2025). महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 च्या निकालाचे विश्लेषणात्मक अध्ययन. Lyceum India Journal of Social Sciences, 1(6), 88–92. https://doi.org/10.5281/zenodo.15132517

LYCEUM INDIA
Journal of Social Sciences